जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी
24 OCT 2019

# शिवाजी विद्यापीठ झोनल फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन



गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयाच्या मैदानावर झोनल फुटबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. किसन कुराडे, महादेव पाटील, बी. जे. देसाई, दीपक कुपन्नावर, दीपक देसाई यांच्यासह अन्य.

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित शिवाजी विद्यापीठ झोनल फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन युनायटेड फुटबॉल असोसिएशनचे खजिनदार महादेव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. किसन कुराडे होते.

आनंद कुंभार यांनी स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे म्हणाले, ही भूमी प्रतापराव गुजर या ऐतिहासिक महापुरुषांच्या पराक्रमाने पावन झालेली आहे. या मातीमध्ये वेगळा सुगंध आणि ताकद आहे. या भागातील अनेक खेळाडू घडले आहेत. शिवराजच्या मैदानावर कसून सराव करणाऱ्या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे सलग आठ वर्षे जनरल चँम्पियनशिप पटकाविले आहे. हे आजच्या खेळाडूंसमोर आदर्शवत आहे. खरेतर खेळामध्ये करिअर करण्यास खूप संधी आहेत. खेळाडूंनी आपल्या खेळातून सिध्द करावे असे आवाहन केले. शिवाजी विद्यापीठ झोनल ऑफिसर दीपक देसाई यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष के. जी. पाटील, सचिव अनिल कुराडे, प्र. प्राचार्य डॉ. बी. जे. देसाई, अॅड. दिग्विजय कुराडे, महादेव सूर्यवंशी, किरण पाटील, युनायटेड फुटबॉल असोसिएनचे प्रशिक्षक दीपक कुपन्नावर, राष्ट्रीय खेळाडू निखिल खन्ना यांच्यासह मान्यवर, विविध महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक, खेळाडू उपस्थित होते.

यावेळी आजरा महाविद्यालय व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड यांच्यामध्ये झालेल्या अटीतटीच्या सामन्यात सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने प्रतिस्पर्धी संघावर १-० ने विजय मिळवला. या सामन्यासाठी पंच म्हणून सुनील पोवार, संदीप पोवार, योगेश हिरेमठ यांनी काम पाहिले. स्पर्धेसाठी राहुल मगदूम, जयवंत पाटील परिश्रम घेत आहेत. तानाजी चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. राहुल मगदूम यांनी आभार मानले.

# ‘बुद्धिझम मुळापासून समजून घ्या’

## डॉ. ज. रा. दाभोळे यांच्या ‘प्रतित्यसमुत्पाद’ पुस्तकाचे प्रकाशन



डॉ. ज. रा. दाभोळे लिखित ‘प्रतित्यसमुत्पाद’ या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना डॉ. राजेंद्र कुंभार. यावेळी डावीकडून डॉ. श्रीकृष्ण महाजन, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. दाभोळे.

कोल्हापूर टाइम्स टीम

‘बुद्धाचे तत्त्वज्ञान हे अस्वस्थतेतून उदयास आलेले तत्त्वज्ञान आहे. मानवी दुःख निवारणासाठी ते मुळापासून समजून घेणे अत्यावश्यक आहे’, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. ज. रा. दाभोळे लिखित ‘प्रतित्यसमुत्पाद’ या इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी डॉ. कुंभार बोलत होते.

विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. कुंभार म्हणाले, बुद्ध तत्त्वज्ञानाचा उगम हा सिद्धार्थांच्या अस्वस्थतेमधून झाला. जगातील दुःख पाहून व्यथित झालेला संवेदनशील मनाचा सिद्धार्थ दुःख निवारणाचा मार्ग शोधण्यासाठी राजप्रासादातून बाहेर पडला आणि पुढे त्याला ज्ञानप्राप्ती झाली. त्यानंतर त्याने ज्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली, त्याच्या मुळाशी ही अस्वस्थता आहे.

डॉ. ज.रा. दाभोळे म्हणाले, ‘बुद्धाने या तत्त्वज्ञानाची मांडणी करतानाही मध्यममार्गाचाच स्वीकार केल्याचे दिसते. याचे कारण म्हणजे बुद्धाला केवळ तात्त्विक काथ्याकूट करण्यात रस नव्हता, तर अखिल मानवजातीला त्याला शोषणमुक्त करावयाचे होते, दुःखमुक्त करावयाचे होते. त्याने दुःखनिवारणाचा अष्टांगमार्ग त्यासाठीच दर्शविला आहे.’

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन यांनी बुद्ध तत्त्वज्ञान मुळापासून समजून घेण्यासाठी दाभोळे यांचे पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. दीपा श्रावस्ती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जगन कराडे, डॉ. पी.एस. कांबळे, रविंद्र श्रावस्ती, विनय कांबळे, आर. वाय. लिधडे, यू. के. सकट, ए. व्ही. मोहोळकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2019
तरुण भारत

# जपानी भाषा परीक्षेत दहा विद्यार्थिनींचे यश

## कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान : विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या दहा विद्यार्थिनींनी 'जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा' (जेएलपीटी) या जपानी भाषेतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविले आहे. या विद्यार्थिनींना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जपानी संस्कृती, तेथील दृढ नातेसंबंध आपल्याला भारतीय संस्कृतीची आठवण करून देतात. कोणतीही विदेशी भाषा शिकल्याने व्यक्तिमत्त्व विकसित होते. आपल्याला त्या भाषेची केवळ माहितीच होत नाही, तर त्या देशाचे लोक आणि त्यांचे जनजीवन आतून समजते.

विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय स्तरावर शिवाजी विद्यापीठाने मिळविलेले यश नक्कीच कौतुकास्पद आहे. जपान व भारतातील आर्थिक परस्परसंबंध अधिकाधिक दृढ होत असल्याने अनेक जपानी कंपन्या भारतात आल्या आहेत. त्यातून जपानी भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध होतात.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात जपानी भाषा परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींच्या प्रमाणपत्र वितरण समारंभात विद्यार्थिनींसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत डॉ. मेघा पानसरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि स्नेहल शेट्ये.

### विद्यार्थिनींचे लक्ष्यवेधी यश

जपान फाऊंडेशन आणि जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा घेतल्या जातात. यातील ५ परीक्षांमध्ये विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील दहा विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य मिळविले. यशस्वी विद्यार्थिनींमध्ये अस्मिता मिरजी, प्राजक्ता गुरव, दीपिका भोसले, मेहजबीन शेख, गौरी सूर्यवंशी, श्वेता पुरी, पूर्वा नाडगोंडा, ऋचा शिंदे, सिमरन कदम व सायली तळवलेकर यांचा समावेश आहे. पूर्वा नाडगोंडा हिने नोकरी, कुटुंब सांभाळत ९४ टक्के गुण मिळवून प्राविण्य प्राप्त केले. प्रा. स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2019
तरुण भारत

# 'वर्ल्ड फूड' डे विविध कार्यक्रमांनी साजरा

कोल्हापूर : वर्ल्ड फूड डे निमित्त शिवाजी विद्यापीठतील डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स ॲन्ड टेक्नालॉजी आणि कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेन, कोल्हापूर मधील डिपार्टमेंट ऑफ फूड टेक्नॉलॉजी यांच्या तर्फे विविध उपक्रमांनी साजरा केला. या कार्यक्रमास बसवराज आवटे (निवृत्त डायरेक्टर एमसीइडी कोल्हापूर) हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. यावेळी आवटे यांनी स्वयंउद्योजकतेविषयी मार्गदर्शन केले. यावेळी फूड क्विझ, मि. ॲन्ड मिसेस आदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कार्यक्रमास २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमास डॉ. जे. एस. बागी (डायरेक्टर), ए. के. साहू (को ऑर्डिनेटर डिपार्टमेंट ऑफ फूड टेक्नॉलॉजी) प्राचार्य डॉ. आर. ए. कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख स्नेहल खांडेकर, सहा. प्रा. डॉ. अभिजीत गाताडे यांनी केले. सुत्रसंचालन अस्मिता आचार्य यांनी केले. यावेळी सुमित कदम यांच्यासह दोन्ही महाविद्यालयातील इतर प्राध्यपक वर्ग उपस्थित होता.

लोकमत

## विदेशी भाषा विभागातील दहा विद्यार्थिनींची बाजी; कुलगुरुंच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण

# 'जेएलपीटी' परीक्षेत शिवाजी विद्यापीठाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या १० विद्यार्थिनींनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील जपानी भाषा प्रावीण्य चाचणी (जेएलपीटी) परीक्षेमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. या विद्यार्थिनींना मंगळवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

जपान फाउंडेशन आणि जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर



जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षेत यश मिळविलेल्या शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनींसमवेत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, मेघा पानसरे, विलास नांदवडेकर, स्नेहल शेट्ये उपस्थित होत्या.

जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील अस्मिता मिराशी, प्राजक्ता गुरव, दीपिका भोसले, मेहजबीन शेख, गौरी सूर्यवंशी, श्वेता पुरी, पूर्वा नाडगोंडा, ऋचा शिंदे, सिमरन कदम, सायली तळवडेकर या विद्यार्थिनींनी यश मिळविले. पूर्वा नाडगोंडा या विद्यार्थिनीने स्वत:ची नोकरी आणि कुटुंब सांभाळत ९४ टक्के गुणांसह विशेष प्रावीण्य मिळविले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, कोणतीही विदेशी भाषा शिकल्याने आपले व्यक्तिमत्त्व विकसित होते. आपल्याला त्या भाषेची केवळ माहितीच होत नाही, तर त्या देशाचे लोक आणि त्यांचे जनजीवन आतून समजू लागते. या कार्यक्रमास मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले.

### पुढील वर्षी फ्रेंच भाषा अभ्यासक्रम

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय स्तरावर शिवाजी विद्यापीठाने मिळविलेले यश नक्कीच कौतुकास्पद आहे. विभागात पुढील वर्षापासून फ्रेंच भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु होणार आहे.

लोकमत

# विद्यापीठात 'जागतिक आहार दिवस'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील अन्नतंत्रज्ञान विभाग आणि सायबर ट्रस्टमधील अन्नतंत्रज्ञान आणि व्यवस्थापन विभागातर्फे 'जागतिक आहार दिवस' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात सेवानिवृत्त सहायक संचालक व एम. सी. ई. डी., कोल्हापूरचे प्रादेशिक अधिकारी बसवराज आवटे यांनी अन्नउद्योगासाठी एम.सी.ई.डी.च्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंत्रज्ञान विभागाचे संचालक प्रा. जयदीप बागी, युवा उद्योजक प्रशांत पाटील व साहिल मणियार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कॉलेज ऑफ नॉन-कन्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेज फॉर वुमेनचे विभागप्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी उपस्थित होते. डॉ. ए. के. साहू यांनी प्रास्ताविक केले.

पुढारी

# विदेशी भाषा शिकल्याने व्यक्तिमत्त्वाचा विकास

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जपानी संस्कृती, तेथील दृढ नातेसंबंध भारतीय संस्कृतीची आठवण करून देतात. कोणतीही विदेशी भाषा शिकल्याने व्यक्तिमत्त्व विकसित होते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या दहा विद्यार्थिनींनी 'जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा' (जे.एल.पी.टी.) या जपानी भाषेतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. विद्यार्थिनींना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व कुलसचिव डॉ. विलास नांदडवेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भारतीय संस्कृती व जपानी संस्कृती यातील साम्य अधोरेखित केले. ते म्हणाले, आपल्याला त्या भाषेची केवळ माहितीच होत नाही तर त्या देशाचे लोक आणि त्यांचे जनजीवन समजू लागतात.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जपानी परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींच्या प्रमाणपत्र वितरण समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. मेघा पानसरे. (छाया : नाज ट्रेनर)**

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाने मिळविलेले यश कौतुकास्पद आहे. पुढील वर्षीपासून फ्रेंच भाषा सर्टिफिकेट कोर्स सुरू होणार आहे.

'जपान फाऊंडेशन' व 'जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा' घेतल्या जातात. यातील एन-५ परीक्षेमध्ये विदेशी भाषा विभागातील दहा विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळविले. यात अस्मिता मिराशी, प्राजक्ता गुरव, दीपिका भोसले, मेहजबीन शेख, गौरी सूर्यवंशी, श्वेता पुरी, पूर्वा नाडगोंडा, रुचा शिंदे, सिमरन कदम व सायली तळवडेकर यांचा समावेश आहे.

जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले.

# दहा विद्यार्थिनींचे जपानी परीक्षेत यश

## शिवाजी विद्यापीठात कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या दहा विद्यार्थिनींनी 'जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा' (जे.एल.पी.टी.) या जपानी भाषेतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. या विद्यार्थिनींना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.



**कोल्हापूर : जपानी परीक्षेत लक्षणीय यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. मेघा पानसरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि स्नेहल शेट्ये.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भारतीय संस्कृती व जपानी संस्कृती यातील साम्य अधोरेखित केले. ते म्हणाले, जपानी संस्कृती, तेथील दृढ नातेसंबंध आपल्याला भारतीय संस्कृतीची आठवण करून देतात. कोणतीही विदेशी भाषा शिकल्याने आपले व्यक्तिमत्त्व विकसित होते. आपल्याला त्या भाषेची केवळ माहितीच होत नाही, तर त्या देशाचे लोक आणि त्यांचे जनजीवन आतून समजू लागते. त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील भाषाकौशल्य प्राप्त करण्यासाठी सदिच्छा दिल्या.

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या की, आंतरराष्ट्रीय स्तरावर शिवाजी विद्यापीठाने मिळविलेले यश नक्कीच कौतुकास्पद आहे. जपान व भारतातील आर्थिक परस्परसंबंध अधिकाधिक दृढ होत असल्याने अनेक जपानी कंपन्या भारतात आल्या आहेत. त्यातून जपानी भाषेच्या विद्यार्थ्यांना करिअरमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. विदेशी भाषा विभागमध्ये रशियन, जर्मन, जपानी भाषांचे सर्टिफिकेट कोर्स शिकवले जातात. या वर्षी जपानी भाषा डिप्लोमा व पोर्तुगीज भाषा सर्टिफिकेट कोर्स सुरू झाले आहेत. पुढील वर्षीपासून फ्रेंच भाषा सर्टिफिकेट कोर्स सुरू होणार आहेत.

जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### विद्यार्थिनींचे लक्षवेधी यश

'जपान फाऊंडेशन' आणि 'जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा' घेतल्या जातात. यातील 'एन ५' परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील दहा विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळविले. या विद्यार्थिनींना विभागामार्फत दोन महिने विनाशुल्क विशेष मार्गदर्शन देण्यात आले. यशस्वी विद्यार्थिनींमध्ये अस्मिता मिराशी, प्राजक्ता गुरव, दीपिका भोसले, मेहजबीन शेख, गौरी सूर्यवंशी, श्वेता पुरी, पूर्वा नाडगोंडा, ऋचा शिंदे, सिमरन कदम व सायली तळवडेकर यांचा समावेश आहे. पूर्वा नाडगोंडा या विद्यार्थिनीने स्वतःची नोकरी व कुटुंब सांभाळत ९४ टक्के गुण मिळवून विशेष प्रावीण्य प्राप्त केले.